**मत्स्यव्यवसाय विभागातील पदांचा आढावा**
**नविन पद निर्मिती करण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन
कृषी,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्र. मत्स्यआ -२००६/प्र.क्र. ८२/पदुम-१२
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक ६ जानेवारी, २००७

**वाचा :-** १) शासन निर्णय ,वित्त विभाग , क्र.असंक १००१/प्रक्र २९/२००१
वित्तीय सुधारणा दिनांक १०.९.२००१
२) शासन पत्र क्र.पदनि १०.०६/प्रक्र ४६/२००६/वित्तीय/
सुधारणा-१ दिनांक १३.६.२००६.

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या आस्थापनेवरील सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्या कार्यालयात अस्तित्वात असलेल्या सर्व पदांचा आढावा घेणे, पदभरती व पदांच्या पुनरुज्जीवनाबाबतचे निर्णय व अतिरिक्त संवर्ग इत्यादिबाबत वित्त विभागाच्या दि.१०सप्टेंबर२००१ च्या शासन निर्णयातील आदेशानुसार व मार्गदर्शक सुचनांनुसार मत्स्यव्यवसाय विभागातील पदांचा सर्वंकष आढावा घेण्यात आला असून त्यास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय समितीने दिनांक ०५.०६.२००६ रोजी झालेल्या बैठकित मंजूरी दिली आहे. मंजूरीनुसार सुधारित १०५० पदांच्या आकृतिबंधापैकी सह आयुक्त मत्स्य ही रु. १२०००-१६५०० या वेतनश्रेणीतील चार पदे नव्याने निर्माण करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या मान्यतेची आवश्यकता होती. याबाबतचा प्रस्ताव दि. २४ नोव्हेंबर,२००६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

**शासन निर्णय :-**

मत्स्यव्यवसाय विभागाच्या १०५० पदांच्या सुधारीत आकृतीबंधानुसार मत्स्यव्यवसाय विभागाच्या आस्थापनेवर रु. १२०००-१६५०० इतक्या वेतनश्रेणीतील खालील ४ पदे नव्याने निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

| | |
|---|---|
| १) सह आयुक्त मत्स्य ( सागरी ) | १ पद |
| २)सह आयुक्त मत्स्य (भूजल) | १ पद |
| ३)सह आयुक्त मत्स्य (निपास) | १ पद |
| ४) सह आयुक्त मत्स्य ( प्रशासन) | १ पद |
| एकूण | ४ पदे |

२. उपरोक्त ४ पदे ही सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर १०५० पदांपैकी असून यास वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ २४२/व्यय १,दिनांक २५.७.२००६ अन्वये मंजूरी मिळाली आहे.

तसेच मंत्रिमंडळाच्या दि. २४ नोव्हेंबर, २००६ रोजी झालेल्या बैठकीत या पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. या पदांच्या सेवाप्रवेश नियमांबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पद भरती करण्यात येईल.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www. maharashtra. gov. in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०१०६१७२४०४००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**( अ.र.परशुरामे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई

आयुक्त मत्स्यव्यवसाय ,महाराष्ट्र राज्य , मुंबई (१५ प्रती )

सर्व विभागीय आयुक्त

महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर

अवर सचिव (व्यय १ ) वित्त विभाग,

संचालक लेखा व कोषागारे, मुंबई

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

निवड नस्ती (पदुम १२)